असा. क्र. २५

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शुक्रवार, मे ९, २००८/वैशाख १९, शके १९३०**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०.**—महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम आणि महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम .. .. .. .. .. .. .. .. **पृष्ठे** २४९-२५०

दिनांक ७ मे २००८ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

### सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ९ मे २००८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम आणि महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

१९५६ चा मुंबई ४९. १९७७ चा महा. १.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम आणि महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ यांमध्ये

आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकोणसाठाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

**प्रारंभिक.**

संक्षिप्त नाव.

१. या अधिनियमास, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते आणि निवृत्तिवेतन (सुधारणा) अधिनियम, २००८ असे म्हणावे.

प्रकरण दोन

**महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याची सुधारणा.**

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४९ याच्या कलम ५ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम ५ मधील, पोट-कलम (१अ) मध्ये, "बारा वेळा एकेरी" या मजकुराऐवजी, "वीस वेळा एकेरी" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९५६ चा मुंबई ४९.

प्रकरण तीन

**महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ याची सुधारणा.**

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ४ ची सुधारणा.

३. महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ याच्या कलम ४ मध्ये, पोट-कलम (१) मधील परंतुक वगळण्यात येईल आणि ते नेहमीच वगळण्यात आले असल्याचे मानण्यात येईल. १९७७ चा महा. १.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई